सांकेतांक क्र 198609 2322

९६०

क्रमांक कॉन/एल. आर. ३४ दुरुस्ती योजना
पुणे, दिनांक २३/९/१९८६.

परिपत्रक

विषय :- जमिन एकत्रिकरण योजना
कार्यान्वित योजनेवरील तक्रारी अर्जाचे
कार्यवाहीबाबत.

तक्रारी अर्जाबाबत प्रस्ताव व अहवाल सादर करणेबाबत सत्वर कार्यवाही व्हावी व तत्संबंधीची पुर्तता परिपत्रकामधील सुचनेनुसार व्हावी व प्रकरणाची आवक जावक मुळे होणारा विलंब कमी व्हावा या हेतुने या कार्यालयाने खालील परिपत्रकाव्दारे सुचना दिलेल्या आहेत.

१] क्र. कॉन/एल. आर. ३४, दि. १९/९/१९७०.
२] क्र. कॉन/दुरुस्त योजना, दि. १५/९/१९७६.
३] क्र. कॉन/एल. आर. १२७/सी-१, दि. १९/८/१९८३.
४] क्र. कॉन/एल. आर. १२७/सी-१, दि. १९/८/१९८३.
५] क्र. कॉन/एल. आर. ३४/दुरुस्त योजना, दि. १५/२/१९८६.

तथापी आपले कार्यालयाकडुन प्राप्त झालेले दुरुस्त योजनेचे प्रस्ताव तपासून पहाता या कार्यालयाकडुन वेळोवेळी दिलेल्या सुचनेनुसार विचार केला जात नाही व पुन्हा पुन्हा तेच शंका/तफावती/उणीवा आमचे नजरेस आलेने प्रकरणांची निर्गत करण्यास खालील बाबींमुळे विलंब होतो.

१] तक्रारी अर्जामध्ये पोटहिस्सा मोजणी चुकीची असल्याचे अर्जाचे प्रमाण शेकडा ६० आहे व या चुकीचा पोटहिस्सा मोजणीमुळे दुरुस्त योजना तयार करावी लागते. या चुकीच्या मोजणीबद्दल भूमापक/निमतानदार जबाबदार असल्यास त्याबाबत नियमाप्रमाणे कडक कारवाई करणेबाबत सुचना दिलेल्या असतानाही तशी कार्यवाही वेळीच केली जात नाही.

२] योजनेपुर्वी व प्रकरणी केलेली नवीन मोजणी यांच्या नकाशाच्या प्रती प्रकरणासोबत जोडल्या जात नाहीत. मोजणीशीटवर मोजणीदाराचे नांव, मोजणीचा दिनांक, तपासणीचा दिनांक मोजणी काम बरोबर आढळून आलेला शेरा व तपासणी शीटवर ज्या ठिकाणी फलकयंत्राने तपासणी केली ते स्थान व आवश्यक गांवे दर्शविली जात नाहीत. गुणाकार बुकावर ज्या खातेदाराची सही नाही त्याचेसह सर्व खातेदारांना क्षेत्र कमी अगर जास्त झालेबद्दलचा जबाब/लेखी समज प्रकरणामध्यें सामील केली जात नाही. तसेंच योजनेपुर्वीचे ७/१२ चे उतारे व शेत पुस्तकाची नक्कल प्रकरणी सामील नसते.

३] जमिन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २४७ मधील तरतुदीनुसार एकत्रिकरण अधिकारी यांनी अधिकार अभिलेख तक्रारीबाबत अपील सह

निर्णय देऊन दुरुस्त योजना/शुध्दीपत्रक करावयाचे किंवा नाही याबाबत आदेश काढून दुरुस्त योजना /शुध्दीपत्रक मंजूर झालेनंतरच गांवचे अधिकार अभिलेख दुरुस्त करावयाचे आहेत. तथापी योजनेच्या कागदीपत्री दुरुस्तीची कार्यवाही न करता परस्पर गांवचे अधिकार अभिलेख दुरुस्त केले जातात ही कार्य-वाही नियमानुसार नाही. अशा गोष्टी निदर्शनास आल्यास त्यास कार्यवाही करावी. तसेच अधिकार अभिलेखातील चौकशीत पुर्वीच्या सातबाराच्या अधिकृत प्रति प्रकरणांत प्राप्त करुन घेतल्या जात नाहीत. अधिकार अभिलेख किंवा इतर दस्तऐवज/पुरावे यांच्या झेरॉक्स प्रती स्वीकारताना त्या साक्षांकित केलेल्या नसतात. साक्षांकित प्रतीच प्रकरणी सामील करण्याची दक्षता घ्यावी.

४] अधिकार अभिलेख दुरुस्त करताना योजनेपुर्वी गांवचे ७/१२ स फेरफार मंजूर न करताच योजनेमध्ये परस्पर अंमल घेतला जातो. या चुकीस जबाबदार कर्मचारी / अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही केली जात नाही, ती केल्याबद्दल प्रकरणात स्पष्ट खुलासा केला पाहिजे.

५] योजनेतील अदलाबदल सर्वसाधारणत: सर्वसंमत असते. तथापी तक्रारीचे कारणा साठी मूळ जमिनी कायम ठेवणे हे एकत्रिकरणाच्या उद्दीष्टाशी संमत आहे. सबब या उद्दिष्टास बाधा न येता एकत्रिकरण अधिकारी यांनीच फेर गट बांधणी सर्वसंमत करुन प्रस्ताव सादर करावयाचा आहे. कितीवरील गट बांधणी करावयाची झाल्यास एकत्रिकरण अधिकारी यांनी तसा सविस्तर अहवाल हरकतपत्रांसह या कार्यालयास सादर करुन या कार्यालयाचे पुर्व परवानगीने पुढील कार्यवाही करावी. यापुढे याकामी सहाय्यक एकत्रिकरण अधिकारी/एकत्रिकरण अधिकारी यांनी एकाच भेटीत चौकशीची कार्यवाही परिपुर्ण करावी म्हणजे एकाच प्रकरणी पुन्हां गांवी जाणेची जरुरी भासणार नाही.

६] खातेदारांच्या तक्रारीची चौकशी पुर्ण होऊन त्यांना अंतिम निर्णय तातडीने दिला जावा या उद्देशाने विहित कालमर्यादा ठरवून दिलेल्या असताही त्याप्रमाणे कार्यवाही होत नाही, अगर विहित मुदत संपल्यानंतरही सदरचे प्रकरण केव्हा सादर केले जाईल याचा अंतरिम अहवाल सादर केला जात नाही. यापुढे विहित मुदतीत प्रकरण तयार करुन सादर करणेस विलंब होणार असेल तर याबाबत या कार्यालयास वाजवी त्या कारणासह अहवाल सादर करुन सदरचे प्रकरण सादर करण्यास आवश्यक असेल त्या मुदतीचा प्रस्ताव पाठविण्याची कटाक्षाने दक्षता घ्यावी.

७] या कार्यालयाकडून वेळोवेळी पाठविलेल्या स्मरणपत्रात/अर्धशासकीय पत्रात ठराविक मुदतीत कार्यवाहीचा अहवाल मागविलेला असतो. तथापी या स्मरणपत्रास / अर्धशासकीय [illegible] आर, वेळीच कार्यवाहीचा अहवाल [illegible]

बाब प्रशासकीय कामकाजाचे दृष्टीने आक्षेपार्ह आहे. यापुढे या कार्यालयाचे प्रत्येक पत्राची वेळीच दखल घेऊन सद्यस्थितीचा अहवाल विहित मुदतीत सादर करणेची दक्षता घ्यावी.

८] वरील सुचनेनुसार तक्रारी अर्जाचेबाबत उपसंचालक भूमि अभिलेख/एकत्रिकरण अधिकारी /अधिनस्थ कार्यालयाकडुन काटेकोरपणे पालन होईल याकडे कटाक्षाने लक्ष पुरवावे व यापुढे परिपत्रकामधील सुचनेनुसार कार्यवाही होत नाही असे आढळून आल्यास याकामी संबंधितांना जबाबदार धरून त्यांचेवर उपसंचालक भूमि अभिलेख यांनी नियमानुसार कार्यवाही करणेची आहे.

सही /-
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेखम.रा.पुणे,यांचेकरिता.

का.प्र.वर मा.ज.आ.पुणे, ]
यांची स्वाक्षरी असे. ]

प्रत :- उपसंचालक भूमि अभिलेख सर्व/एकत्रिकरण अधिकारी[स.ए.अ. यांच्या जादा प्रतिसह] यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२/- वरील परिपत्रकाची पोहोच या कार्यालयास ७ दिवसांचे आंत पाठवावी.